राज्यातील सामान्य/सर्वसाधारण प्रवर्गातील सुशिक्षित
बेरोजगारांना उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रमाबाबत
उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम.- सुधारित योजना

# महाराष्ट्र शासन

उंद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्र.एसएसआय-२००३/प्र.क्र.७९१८/उद्योग-७
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २९ ऑक्टोबर, २००७.

**प्रस्तावना :-**

सुशिक्षित बेरोजगारांना विविध प्रशिक्षण कार्यक्रमांच्या माध्यमाने सामाजिक न्याय देण्याचे शासनाचे धोरण आहे.महाराष्ट्रात प्रामुख्याने राज्य शासनाने पुरस्कृत केलेली महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, औरंगाबाद व मिटकॉन कन्सल्टन्सी सर्व्हीसेस लि. व अन्य मान्यताप्राप्त संस्था उद्योजकता प्रशिक्षणाचे काम करीत आहेत. समाजकल्याण विभागाशी संबंधित विविध महामंडळांमार्फत मोठया प्रमाणात सुशिक्षित बेरोजगार व्यक्तींना मदत देण्यात येते. मात्र उद्योजकता विकास अद्यापही अपेक्षेप्रमाणे होत नाही असे निदर्शनास आले आहे. त्याकरिता सन २००७-०८ या वर्षाकरिता उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम (सर्वसाधारण) राबविणेसाठी रुपये २०६.७८ लाख एवढा निधी उपलब्ध आहे.

सध्या अस्तित्वात असलेल्या उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमात विविध विशेष तांत्रिक प्रशिक्षण कार्यक्रम घेणे, हे गरजेचे आहे. अस्तित्वात असणाऱ्या उद्योजकता विकास योजनामध्ये महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयामार्फत अनिवासी १० दिवसांचे प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात येत होते. प्रती प्रशिक्षणार्थी १०० रु. विद्यावेतन व प्रशिक्षण देणारे महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र यांना १००० रु. आकस्मिक खर्चासाठी दिले जातात. महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र प्रशिक्षणार्थ्यांकडून १५० ते २५० रुपये पर्यंत जादा शुल्क आकारुन १० दिवसाचे उद्योजकता विकास प्रशिक्षण दिले जात होते. त्यात उद्योजकास प्रशिक्षणशुल्क व स्वखर्चाने येण्याच्या अडचणीमुळे त्यांचे प्रशिक्षण घेण्याचे आकर्षण कमी प्रमाणात दिसून येते. अनुसूचित जाती प्रवर्गातील सुशिक्षित बेरोजगारांना उद्योजकता प्रशिक्षणाकडे आकर्षित करण्यासाठी दिनांक ७/२/२००२ च्या शासन निर्णयान्वये सुधारित योजना लागू करण्यात आली. त्याच धर्तीवर राज्यातील सामान्य / सर्वसाधारण प्रवर्गातील सुशिक्षित बेरोजगारांना उद्योजकता विकास व तांत्रिक प्रशिक्षण देण्यासाठी व त्या अनुषंगाने स्वयंरोजगारास प्रवृत्त करण्याकरिता सुशिक्षित बेरोजगारांच्या बाबतीत सध्याच्या धोरणात बदल करुन सुधारीत योजना मंजूर करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता. सदर सुधारीत योजना पुढीलप्रमाणे मंजूर करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे.

**शासन निर्णय :-**

राज्यातील सामान्य/सर्वसाधारण प्रवर्गातील सुशिक्षित बेरोजगारांकरीता उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमासंदर्भात अस्तित्वात असलेल्या योजनेबाबतचे आदेश अधिक्रमित करुन त्यांना तांत्रिक

प्रशिक्षण देणे आणि उद्योजकता विकास करणे याबाबत अस्तित्वात असलेल्या योजनेशी सांगड घालून खालील तीन कार्यक्रमांव्दारे अंमलबजावणीकरीता खालीलप्रमाणे सुधारणा करण्यांत येत आहे :-

| | | |
|---|---|---|
| १ | योजनेचे नांव | उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम. |
| २ | योजनेचा उद्देश | सामान्य / सर्वसाधारण प्रवर्गातील सुशिक्षित बेरोजगारांना उद्योजकता विकास आणि तांत्रिक प्रशिक्षण देऊन स्वयंरोजगारासाठी त्यांची तयारी करणे. |
| ३ | प्रशिक्षण देणारी संस्था | महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, औरंगाबाद / मिटकॉन कन्सल्टन्सी सर्व्हीसेस लि., पुणे ( किंवा आवश्यकतेनुरुप उद्योग संचालनालयाने मान्यता दिलेली अन्य सक्षम प्रशिक्षण संस्था ) /महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र/उद्योग सह संचालक, मुंबई प्राधिकरण विभाग राहील. |
| ४ | अंमलबजावणी करणारी यंत्रणा | १) संबंधित महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,<br>२) मुंबई शहर आणि उपनगरामध्ये उद्योग सहसंचालक मुंबई प्राधिकरण<br>३) योजनेंतर्गत इच्छूक प्रशिक्षणार्थीची निवड आणि पाठपूरावा करण्याकरिता जिल्हास्तरीय समिती. |
| ५ | कार्यपध्दती | सदर योजनेंतर्गत प्राप्त झालेल्या अर्जाची निवड करण्यासाठी एक कार्यबल समिती असेल. या समितीची रचना पुढीलप्रमाणे राहील :- |

| | |
|---|---|
| महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र (मुंबई शहर आणि उपनगरासाठी उद्योग सह संचालक, मुंप्रावि, मुंबई ) | अध्यक्ष |
| जिल्हा समाज कल्याण अधिकारी | उपाध्यक्ष |
| जिल्हयातील अग्रणी बँकेचे प्रतिनिधी | सदस्य |
| प्रकल्प अधिकारी, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र(किंवा शासन निर्णय दिनांक ०७/०२/२००२ च्या निकषानुसार मुख्यालयाने मान्यता दिलेली प्रशिक्षण संस्था.) | निमंत्रक |

५.१ लाभार्थी उद्योग/व्यवसाय उभारणेसाठी कर्ज/अनुदान मिळण्याकरिता कोणत्या योजनेंतर्गत पात्र आहे याबाबत कार्यबल समिती मार्गदर्शन करेल.

५.२ प्रशिक्षणार्थीचा प्रकल्प उभारणीकरीता कार्यबल समितीचे घटक संयुक्तपणे प्रयत्न करतील.

५.३ महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, मिटकॉन कन्सल्टन्सी सर्व्हीसेस लि व अन्य संस्थांनी, कार्यबल समितीने ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करावेत. प्रशिक्षक संस्थेने स्थानिक वर्तमान पत्रांतून जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन कार्यालयात उपलब्ध असलेल्या यादीतून प्रशिक्षणार्थींचे अर्ज मागवावेत. १ दिवसाचे उद्योजकतेबाबत जागृती मेळावे घेऊन अर्ज प्राप्त करता येऊ शकतील. मेळाव्यास, प्रशिक्षण मुलाखतीकरिता व प्रशिक्षणाकरिता येणा-या लाभार्थीस कोणत्याही प्रकारचा प्रवास/दैनिक भत्ता देता येणार नाही.

५.४ उमेदवाराची निवड करताना समितीने महिलांना तसेच भूमिहीन शेतक-यांना प्राधान्य दयावे.

५.५ प्रशिक्षण कार्यक्रम झाल्यावर प्रशिक्षण खर्चाच्या प्रतिपूर्तीकरिता संबंधित प्रशिक्षण संस्थेने जिल्हा उद्योग केंद्राकडे मागणी करावी. योग्य प्रकारे प्रशिक्षण दिल्याची खातरजमा करुन योजनेकरिता ठरविलेल्या खर्चाच्या मार्गदर्शक तत्वानुसार खर्चाची प्रतिपूर्ती महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र किंवा उद्योग सह संचालक, मुंप्रावि, मुंबई करतील.

५.६ प्रशिक्षण कार्यक्रमांचे नियोजन, समन्वय व पाठपुरावा महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, मिटकॉन कन्सल्टन्सी सर्व्हीसेस लि वा इतर तत्सम मान्यता प्राप्त प्रशिक्षण संस्था करेल.

५.७ **लाभार्थीची पात्रता :-**

१. उमेदवार किमान ७ वी पास किंवा पदवी/पदविका/आयटीआय प्रमाणपत्र किंवा किमान कौशल्यावर आधारित व्यावसायिक अभ्यासक्रम प्रमाणपत्र धारक असावा.

२. उमेदवाराचे वय १८ ते ४५ वर्षे असावे.

३. उमेदवार कोणत्याही वित्त संस्थेचा थकबाकीदार नसावा.

६ या योजनेंतर्गत खालीलप्रमाणे प्रशिक्षण कार्यक्रम राहतील:-

| प्रशिक्षण कार्यक्रम | | कालावधी | प्रकार | प्रति कार्यक्रम प्रवेश शुल्क |
|---|---|---|---|---|
| १ | उद्योजकता परिचय कार्यक्रम | १ दिवस | अनिवासी | निशुल्क |
| २ | उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम | १२ दिवस | निवासी | निशुल्क |
| ३ | तांत्रिक प्रशिक्षण कार्यक्रम प्रशिक्षणार्थी | १५ दिवस ते २ महिने (आवश्यकतेनुसार कार्यबल समिती ठरवेल ) | अनिवासी | निशुल्क |

**ही योजना मुंबई/मुंबई उपनगरासह महाराष्ट्रातील सर्व जिल्हयात राबविण्यांत येईल.**

७. **उद्योजकता परिचय कार्यक्रम : ( १ दिवस, अनिवासी )**

एक दिवसाच्या परिचय कार्यक्रमैंत व्यवसायाची निवड, उद्योजकीय व्यक्तिमत्व विकास, व्यवसाय व्यवस्थापन, शासनाच्या विविध संस्था व अर्थसहाय्य देणा-या संस्था व त्यांचेमार्फत राबविल्या जाणा-या योजनांबाबत माहिती, बाजारपेठ पाहणीबाबत सर्व सामान्य माहिती इ. समावेश राहील. प्रति कार्यक्रम ६००/- रु. खर्च करता येईल. प्रशिक्षणार्थ्यांकडून या कार्यक्रमासाठी शुल्क आकारण्यात येणार नाही. हे कार्यक्रम महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र/ मिटकॉन कन्सल्टन्सी सर्व्हीसेस लि /महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र/ उद्योग सह संचालक, मुंप्रावि घेऊ शकतील.

८. **उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम : ( १२ दिवस, निवासी )**

छोटया उद्योजकांस, उद्योग व व्यवसाय उभारतांना अनेक प्रकारच्या अडचणी भेडसावतात व त्यावर मात करण्याकरीता प्रशिक्षणाव्दारे माहिती अगोदर मिळाल्यास तो उद्योग/व्यवसाय उभारण्यास सक्षम होईल. प्रशिक्षणाच्या आर्थिक व तांत्रिक बाजूचा विचार करुन प्रशिक्षण १२ दिवसांचे, निवासी व भोजन व्यवस्थेसह असेल आणि यासाठी प्रति प्रशिक्षणार्थी रु. ४०००/- या कमाल मर्यादेपयैत रक्कम प्रशिक्षण संस्थेस अनुज्ञेय राहील. ही जबाबदारी संबंधित प्रशिक्षण संस्था घेईल. पात्रतेच्या अटीस अधिन राहून निवडलेल्या प्रशिक्षणार्थीना खालीलप्रमाणे उद्योगांशी संबंधित कलागुणांचा विकास व माहिती मिळण्याचा प्रशिक्षणात प्रामुख्याने समावेश राहील:-

८.१. **प्रशिक्षण विषय :**

१ उद्योजकतेकरिता आवश्यक असलेले गुण व उद्योजकीय व्यक्तिमत्व विकास
२ अर्थ सहाय्य देणा-या विविध संस्था व त्यांचे अर्थ सहाय्य मिळण्याकरीता कार्यप्रणाली.
३ मागणी/बाजारपेठ सर्वेक्षण कसे करावे.
४ विविध उद्योगांमध्ये उपलब्ध असलेल्या संधी
५ व्यवसायांशी संबंधित कायदे व त्यांकरिता अवलंबण्याची कार्यपध्दती
६ व्यवसाय उभारणीत येणा-या अडचणी व त्यांचे निराकरण कसे करावे.
७ हिशोब व इतर लेखाविषयक बाबी.
८ पणन व्यवस्थापन
९ उद्योगांना प्रत्यक्ष भेटी व उद्योजकांचे अनुभव
१० प्रकल्प अहवाल तयार करणे व त्याचे विश्लेषण.
११ आवश्यकतेनुसार इतर विषय

## ९ तांत्रिक प्रशिक्षण कार्यक्रम :( १५ दिवस ते २ महिने, अनिवासी )

या प्रशिक्षणात उत्पादन/सेवा उद्योगांशी निगडीत असलेल्या प्रकारामध्ये तांत्रिक कौशल्य वाढविणे, नवीन माहिती देणे इत्यादींचा अंतर्भाव राहील. लाभार्थ्यांना स्वतंत्रपणे तो व्यवसाय करण्याकरिता आत्मविश्वास प्राप्त होईल इतपत प्रात्यक्षिके व प्रत्यक्ष कामाचा अनुभव प्रशिक्षणार्थींना मिळण्याच्या दृष्टीने प्रशिक्षणाचे स्वरुप ठेवण्यांत येईल. खालील व्यवसायांचा मुख्यतः तांत्रिक शिक्षण व उद्योजकतेच्या प्रशिक्षणात समावेश राहील:-

१. फॅशन डिझायनिंग व विणकाम
२. फोटोग्राफी आणि व्हिडीओ शूटींग
३. बेकरी
४. टाय अँड डाय, बाटिक पेंटींग
५. दुचाकी वाहन दुरुस्ती
६. बंदिस्त शेळी पालन
७. शिवणकाम
८. ब्युटी पार्लर
९. डीटीपी आणि स्क्रीन प्रिंटींग
१०. संगणक जोडणी, दुरुस्ती व देखभाल
११. फळ प्रक्रिया
१२. आयुर्वेदिक वनस्पती लागवड व प्रक्रिया
१३. नर्सरी मॅनेंजमेंट
१४. घरगुती उपकरणे दुरुस्ती व देखभाल
१५. मल्टीपर्पज मेकॅनिक्स
१६. कॅटरिंग व इतर व्यवसाय
१७. इतर उद्योग/सेवा उद्योग ( कार्यबल समितीने ठरविलेले )

**९.१** या व्यवसायाव्यतिरिक्त जिल्हयातील गरज व प्रशिक्षण संस्थेच्या क्षमतेनुसार कार्यबल समितीचे मान्यतेने व वाव असलेल्या इतरही व्यवसायांचे तांत्रिक प्रशिक्षण देता येईल. हे प्रशिक्षण अनिवासी असेल.

(अ) प्रशिक्षक संस्था, १५ दिवस, १ महिना व २ महिन्यांच्या तांत्रिक प्रशिक्षण कार्यक्रमांसाठी प्रत्येक सामान्य प्रशिक्षणार्थीस अनुक्रमे रु.५००/-, रु.१०००/ व रु.२००० विद्यावेतन देईल. प्रशिक्षण संस्थेस प्रति प्रशिक्षणार्थी रु.३०००/- प्रतिमहा अदा करण्यात येईल.

**१०** महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, व मुंबई शहर व उपनगराकरिता उद्योग सह संचालक, मुंप्रावि हे योजनेवर नियंत्रण ठेवतील.

**११** (अ) प्रशिक्षण कार्यक्रमाची सुधारणा व योग्य अंमलबजावणी होणेसाठी सदर योजनेचे जिल्हा/विभागीय/राज्य स्तरावर नियतकालीन मूल्यांकन करण्यात येईल.

(ब) या योजने अंतर्गत प्रशिक्षणार्थीने घेतलेल्या प्रशिक्षणाचा परिणाम मूल्यमापन नियतकालीकरित्या स्वतंत्रपणे जिल्हा / विभाग / राज्यस्तरावर करण्यात येईल.

**१२** उद्योजकता विकास प्रशिक्षण व तांत्रिक कौशल्य विकास प्रशिक्षणात एका वेळेस जास्तीत जास्त ३० ते ४० प्रशिक्षणार्थी घ्यावेत.

१३ प्रशिक्षण देणारी संस्था किमान ५ वर्षापासून उद्योजकता विकास प्रशिक्षणाच्या क्षेत्रात काम करणारी मान्यताप्राप्त असावी. संस्थेमध्ये उद्योजकता प्रशिक्षण क्षेत्रातील केंद्र शासनाने मान्यता दिलेल्या संस्थेमधून प्रशिक्षण घेतलेले प्रेरक प्रशिक्षक असावेत व त्यांचेकडे प्रशिक्षण देणे करीता आवश्यक त्या सुविधा असाव्यात.

१४ सर्वसाधारण योजनेंतर्गत/विशेष घटक योजनेंतर्गत/आदिवासी उपयोजना क्षेत्र प्रशिक्षणाचे कार्यक्रम एकत्रित घेता येतील. प्रशिक्षणार्थींचा खर्च संबंधित योजनेतून करण्यात यावा.

हा शासन निर्णय नियोजन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( नं. वि. पाटील)
कार्यासन अधिकारी

प्रति,

विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त/ अपर उद्योग संचालक,
सह संचालक (उद्योग), नागपूर / पुणे / नाशिक / औरंगाबाद
अधिक्षकीय उद्योग अधिकारी, कोकण / अमरावती विभाग
सह संचालक, मुंबई महानगर प्राधिकरण चुनाभट्टी, मुंबई
सर्व जिल्हाधिकारी / उप आयुक्त (उद्योग)
सचिव, सामाजिक न्याय, व विशेष सहाय्य विभाग, मुंबई
संचालक, सामाजिक न्याय, व विशेष सहाय्य विभाग, पुणे
सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र
महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, औरंगाबाद
मिटकॉन कन्सल्टन्सी सर्व्हीसेस लि.,पुणे
महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता / लेखापररिक्षा), मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा) नागपूर
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
वित्त विभाग (व्यय-१६), मंत्रालय, मुंबई
नियोजन विभाग , मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती (उद्योग-७)